# द रिटर्न ऑफ शेरलॉक होम्स


लेखक

**ऑर्थर कॉनन डायल**

अनुवाद

**विवेक जोशी**



**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**द रिटर्न ऑफ शेरलॉक होम्स : ऑर्थर कॉनन डायल**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २३०/-

**(टीप – सदर मूळ इंग्रजी कथासंग्रहातील 'द ॲडव्हेंचर ऑफ ॲबे ग्रेंज' व 'द ॲडव्हेंचर ऑफ द सेकंड स्टेन' या दोन कथा यापुढील कथासंग्रहात घेण्यात आलेल्या आहेत.)**

# प्रास्तविक

या पुस्तकात ‘स्टडी इन स्कार्लेट’ ‘द साईन ऑफ फोर’ ‘द हाऊंड ऑफ दि बास्करव्हिल आणि ‘द व्हॅली ऑफ फिअर्स’ या चार कादंबऱ्या वगळता शेरलॉक होम्सच्या काही कथांचा संग्रह आहे.

या स्वरूपात तो सर्वप्रथम १८९२ साली ‘ए स्कॅन्डल इन बोहेमिया’ या कथेतून अवतीर्ण झाला आणि १९२७ साली ‘सोकोंब ओल्ड प्लेस’ या कथेद्वारे त्यानं आपला निरोप घेतला. त्याची पद्धती आणि व्यक्तिचित्र आत्तापर्यंत लोकांना चांगलंच परिचित झालं होतं. त्यामुळे स्वाभाविकपणे वाचकांना आश्चर्य वाटणं कमी झालं व पूर्वीच्या कथांशी नवीन कथांची तुलना होऊ लागली. एकानं तर प्रतिक्रिया व्यक्त केली की, ‘‘भले तो कड्यावरून पडून मेला नसेल पण तो पूर्वीचा होम्स निश्चितच राहिला नाही.’’ मला विश्वास आहे की, वाचकांनी यापैकी कोणतीही कथा वाचली तरी त्यांना कथेची सुरुवात आणि शेवट जराही खटकणार नाही.

कोबरो, १९२८ — ऑर्थर कॉनन डायल

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | रिकाम्या घराचे रहस्य<br>(द एम्प्टी हाऊस) | ... | ९ |
| २. | विलक्षण वारसा<br>(द नॉरवुड बिल्डर) | ... | ३० |
| ३. | भयनृत्य/यमदूतांचा नाच<br>(द डान्सिंग मेन) | ... | ५६ |
| ४. | खरा तो प्रेमा<br>(द सॉलिटरी सायकलिस्ट) | ... | ८५ |
| ५. | अपहरण<br>(द प्रायरी स्कूल) | ... | १०७ |
| ६. | रंग काळा, करणी काळी<br>(ब्लॅक पीटर) | ... | १४२ |
| ७. | न्यायदान<br>(चार्ल्स ऑगस्टस मिल्व्हरटन) | ... | १६६ |
| ८. | मूर्तिभंजन<br>(दि सिक्स नेपोलियन्स) | ... | १८५ |
| ९. | चुकीच्या वाटेनं<br>(द थ्री स्टुडंट्स) | ... | २०७ |
| १०. | चष्म्याची साक्ष<br>(द गोल्डन प्रिन्स -नेझ) | ... | २२६ |
| ११. | नियतीचा खेळ<br>(द मिसिंग थ्री क्वॉर्टर्स) | ... | २५० |


✦✦

# १. रिकाम्या घराचे रहस्य

१९८४ सालातील वसंत ऋतूचे दिवस. रोनाल्ड अडेअरच्या भीषण खुनानं साऱ्या लंडनवासीयांचं लक्ष वेधून घेतलं होतं. उच्चभ्रू वर्गाचं तर या गूढ प्रकरणानं धाबंच दणाणलं होतं. पोलीस तपासातून बाहेर आलेला तपशील लोकांना समजलाच होता, तरीसुद्धा बऱ्याचशा गोष्टी अजूनही गुलदस्त्यातच होत्या. ह्या प्रकरणामुळं मधल्या दहा वर्षांचे दुवे जुळवले गेले. या खुनातील रहस्य चित्तवेधक होतंच, पण या प्रकरणामुळंच माझ्या आयुष्यातील हरपलेला आनंद, उत्साह मला परत मिळाला. ज्या लोकांनी आत्तापर्यंत मी सांगितलेल्या गोष्टी आवडीनं, औत्सुक्यानं ऐकल्या त्यांना माझ्या आनंदात सहभागी करून घेतलंच पाहिजे.

शेरलॉक होम्सच्या सान्निध्यात दिवस घालवल्यामुळे मलाही अशा गुन्ह्यांबद्दल कुतूहल वाटू लागलं होतं. त्यामुळं होम्स बेपत्ता झाल्यावर मी त्याच्या पद्धतीनं काही गुन्ह्यांचा तपास स्वत:च्या समाधानासाठी केला होता. थोडंफार यशही मिळालं होतं. या सर्वांत थरारक प्रकरण होतं ते रोनाल्ड अडेअरचं. काही अज्ञात गुन्हेगारांनी केलेल्या भीषण कृत्याचा तपशील वाचला मात्र, मला शेरलॉक होम्सच्या मृत्यूमुळं समाजाची किती अपरिमित हानी झाली आहे याची पुन्हा तीव्रतेने जाणीव झाली. या खुनाच्या रहस्यानं त्याचं चित्त निश्चितच वेधून घेतलं असतं. युरोपातील सर्वश्रेष्ठ अशा त्या गुप्तहेरानं पोलिसांच्या तपासकार्यात बहुमोल साहाय्य केलं असतं. दिवसभर मी त्या घटनेवर विचार करत होतो, पण काहीही उलगडा होत नव्हता. एकंदर काय प्रकार घडला ते पुन्हा एकदा सांगतो.

रोनाल्ड अडेअर हा एक ऑस्ट्रेलियन कॉलनीचा गव्हर्नर म्हणून काम केलेल्या अर्ल ऑफ मेनूथचा नंबर दोनचा मुलगा. अडेअरची आई ऑस्ट्रेलियाहून मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेसाठी परत आली होती. ती, तिचा मुलगा रोनाल्ड आणि मुलगी हिल्डा हे तिघेजण ४२७, पार्क लेन इथं राहात असत. तरुण रोनाल्ड नेहमी उच्चभ्रू लोकांत वावरत असे. त्याला कोणी शत्रू असल्याचं किंवा एखादं व्यसन असल्याचं ऐकिवात नव्हतं. कारस्टेअर्स येथील एडीथ वुडलेबरोबर त्याचा विवाह ठरला होता आणि लगेच मोडलाही होता. पण त्यामागे काही द्वेषभावना नव्हती. उभय पक्षांच्या संमतीनंच सारं काही झालं होतं. एरव्ही त्याच्या दैनंदिन वागण्यात खळबळजनक असं काहीच नव्हतं. सरळ मार्गानं जाणाऱ्या या तरुणाचा मृत्यू मात्र एकदम अनपेक्षितपणे ३० मार्च १८९४ रोजी रात्री १० ते ११.२० या दरम्यान गूढ प्रकारे झाला.

रोनाल्ड अडेअरला पत्ते खेळण्याची आवड होती, पण आपल्या अंगाशी येईल एवढ्या मोठ्या प्रमाणात तो कधीच खेळत नसे. बाल्डवीन, कॅव्हेंडिश आणि बॅगटेल अशा तीन मंडळांचा तो सभासद होता. मृत्यू झाला त्या दिवशी दुपारी तो बाल्डवीन क्लबमध्ये खेळला होता. त्याच्याबरोबर पत्ते खेळलेल्या मूरे, सर जॉन हार्डी व कर्नल मोरॅन यांनी सांगितलं की, त्या दिवशी खेळ सारखाच झाला. अडेअरचं फार तर पाच पौंडांचं नुकसान झालं असेल, त्यापेक्षा जास्त निश्चितच नाही. त्याच्या दृष्टीनं एवढं नुकसान म्हणजे काहीच नाही. तो रोज या ना त्या क्लबात खेळत असे आणि डोकं ठिकाणावर ठेवून खेळत असल्यानं बहुतेक सर्व वेळा जिंकतच असे. केलेल्या तपासातून समजलं होतं की, काही आठवड्यांपूर्वीच त्यानं कर्नल मोरॅन यांच्या भागीदारीत गॉडफ्रे मिलर आणि लॉर्ड बालमोरॅल यांच्यकडून चारशे वीस पौंड जिंकले होते.

खून झाला त्या दिवशी रात्री १० वाजता तो क्लबमधून परत आला. त्याची आई आणि बहीण नातेवाईकांकडे काही कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. तो दुसऱ्या मजल्यावरील समोरच्याच खोलीत गेल्याचं एका मोलकरणीनं ऐकलं होतं. तो नेहमी तिथंच बसत असे. तिनं त्या खोलीतली शेगडी पेटवली, धूर होऊ लागला म्हणून खिडकी उघडली. लेडी मूनथ आणि त्यांची मुलगी ११.२० वाजता परत आल्या. तोपर्यंत त्याच्या खोलीतून कसलाही आवाज ऐकू आला नाही. झोपायला जाण्यापूर्वी रोनाल्डला 'गुड नाईट' म्हणावं म्हणून त्याची आई त्याच्या खोलीकडे

वळली. दरवाजा ठोठावला तरी आतून काहीच उत्तर आलं नाही. अखेर चार लोक मदतीला बोलावून दरवाजा फोडण्यात आला. त्या दुर्दैवी तरुणाचा देह टेबलाजवळ पसरलेला दिसला. मस्तकाच्या रिव्हॉल्व्हरच्या गोळीनं चिंधड्या झाल्या होत्या, पण खोलीत त्या प्रकारचं कोणतंही हत्यार आढळलं नाही. टेबलावर दहा-दहा पौंडाच्या दोन नोटा आणि १७ पौंडाची सोन्या-चांदीची नाणी होती. त्यांचे छोटे छोटे ढीग केलेले होते. एका कागदावर त्याच्या काही मित्रांची नावं आणि आकडे खरडलेले दिसत होते. मृत्यूपूर्वी तो खेळातल्या नफ्यातोट्यांचा हिशेब करत असावा.

या प्रकाराची बारीकसारीक चौकशी करायला लागलो तसा गोंधळ अधिकच वाढला. पहिला प्रश्न पडला -त्यानं दरवाजा आतून लावला कशासाठी? खुन्यानं दरवाजा लावून घेऊन खिडकीतून पळ काढला असण्याचीही शक्यता होती आणि खाली बहरलेल्या फुलझाडांचे ताटवे होते. फुलझाडांची नासधूस झालेली दिसली नाही, तसंच घर आणि रस्त्याच्या मधील हिरवळीवरही कुणाचे ठसे दिसले नाहीत. रोनाल्डनं दरवाजा लावून घेतला असावा असं वाटलं, पण त्याचा मृत्यू कसा झाला? मागं काही पुरावा ठेवल्याशिवाय खिडकीतून आत येणं अशक्यच होतं. खिडकीतून गोळी घातली असती तर जखम अधिक मोठी झाली असती. पार्क लेन हा तसा वर्दळीचा रस्ता. घरापासून शंभर यार्डांवरच घोडागाड्यांचा स्टँड होता. असं असूनही कुणीही गोळीबाराचा आवाज ऐकला नाही. तरीसुद्धा खून झाला होता. सापडलेल्या गोळीवरून आणि जखमेवरून मृत्यू ताबडतोब झाला असावा हे स्पष्ट दिसत होतं. एकंदरीत अशी परिस्थिती होती. टेबलावरील पैसे किंवा खोलीतील मौल्यवान चीजवस्तू यांना हात लावलेला नव्हता. खुनामागे कोणताही हेतू दिसत नव्हता, अडेअरला कोणीही शत्रू नव्हता. या सर्व गोष्टींमुळे हे पार्क लेन प्रकरण अधिकच गूढ बनलं होतं.

सारा दिवस मी या घटनेवरच विचार करत होतो. 'प्रत्येक तपासामागं काहीतरी निश्चित सूत्र असतं' असं माझा मित्र नेहमी म्हणत असे. तसं काही सूत्र आपल्याला सापडतं का या दृष्टीनं माझा प्रयत्न चालू होता. फारच थोडी प्रगती झाली होती. संध्याकाळी फिरत फिरत मी पार्क लेनच्या टोकाला असलेल्या ऑक्सफोर्ड रस्त्यापर्यंत गेलो. रिकामटेकड्या टोळभैरवांचा घोळका त्या विशिष्ट खिडकीकडे बघत उभाच होता. त्यामुळं मला हवं होतं ते घर

लगेचच मिळालं.  काळा चष्मा लावलेला एक उंच, सडपातळ माणूस आपण काढलेले निष्कर्ष ऐकवत होता. माझ्या मते तो साध्या वेशातील गुप्त पोलीसच असावा. त्याच्याभोवती बघ्यांनी गर्दी केली होती. मी थोडासा पुढं होऊन त्याच्या शक्य तितका जवळ गेलो पण त्याचे निष्कर्ष मला फारच हास्यास्पद वाटले म्हणून मी मागं फिरलो. मी वळताच माझ्या मागंच उभ्या असणाऱ्या एका वयस्क इसमाला माझा धक्का लागला. त्याच्या हातातली पुस्तकं माझ्या धक्क्यानं खाली पडली. त्याची पुस्तकं उचलता उचलता एका पुस्तकाचं नाव वाचल्याचं मला आठवतं. ते होतं 'दि ओरिजिन ऑफ ट्री-वर्शिप' तो माणूस जुन्या पुस्तकांची खरेदी-विक्री करणारा असावा. त्याचा व्यवसाय किंवा आवड यामुळं तो असली गूढ विषयांवरील पुस्तकं गोळा करत असावा असं मला वाटलं. माझ्या हातून नकळत घडलेल्या चुकीबद्दल मी त्याची माफी मागणार होतो, पण मी पाडलेलं पुस्तक त्याच्या दृष्टीनं फारच मौल्यवान असावं. गुरगुरतच तो मागं फिरला आणि क्षणार्धात किंचित कुबड व पांढरे कल्ले असणारी त्याची आकृती गर्दीत दिसेनाशी झाली.

४२७ पार्क लेन या जागेचं मी निरीक्षण केलं. त्यातून फारसं काही साध्य झालं नाही. घराभोवती असणारी भिंत आणि कुंपण जेमतेम पाच फूट उंचीची होती. त्यावरून उडी मारून बागेत जाणं कुणालाही शक्य होतं; पण खिडकीजवळ पाईप किंवा चढून वर जाण्यासारखं काहीच साधन नव्हतं. पूर्वीपेक्षा अधिकच गोंधळून जाऊन मी परत केन्स्टिंगच्या दिशेनं वळलो. मी माझ्या अभ्यासिकेत शिरून जेमतेम पाच मिनिटं झाली असतील तोच मोलकरीण येऊन सांगू लागली की, मला भेटायला कोणीतरी आलंय. ती व्यक्ती म्हणजे दुसरं तिसरं कुणी नसून तो पुस्तकसंग्राहकच आहे हे बघून मी थक्कच झालो. पांढऱ्या शुभ्र केसांच्या महिरपीतून त्याचा सुरकुतलेला चेहरा पुढं आल्यासारखा वाटत होता. त्याच्या उजव्या हातात डझनभर मौल्यवान पुस्तकांचं ओझं होतंच.

''मला बघून आपल्याला आश्चर्य वाटलं असेल!'' तो कर्कश्श आवाजात म्हणाला,

मीही ते मान्य केलं.

''त्याचं असं झालं ! तुमच्या पाठोपाठ धडपडत येताना तुम्हाला याच घरात शिरताना पाहिलं आणि वाटलं, आत शिरून मघाच्या माझ्या विचित्र वर्तनाचा

खुलासा करावा. माझ्या मनात खरंच काही नव्हतं. मला पुस्तकं उचलायला आपण मदत केलीत त्याबद्दल खरंच मी आपला आभारी आहे.''

''हे आपण फारच करत आहात. पण आपल्याला माझं नाव कसं समजलं?'' मी विचारलं.

''मी आपला शेजारीच आहे. चर्चस्ट्रीटच्या कोपऱ्यावर माझं छोटंसं दुकान आहे. आपण हवी ती पुस्तकं घेऊ शकता. ही बघा, ब्रिटिश वर्ड्स, होली वॉर, कॅटूलस- किंमत कमी-जास्त करू शकतो. दुसऱ्या फळीवर पाच पुस्तकं सहज राहतील. ती मोकळी जागा विचित्रच वाटते, नाही का?''

मी पाठीमागचं कपाट बघण्यासाठी मान फिरवली. पुन्हा समोर बघतो तो टेबलाच्या पलीकडे शेरलॉक होम्स उभा राहून हसत होता. मी ताडकन उभा राहून काही क्षण आश्चर्यचकित होऊन बघतच राहिलो. आयुष्यात प्रथमच मला चक्कर आली. डोळ्यांसमोर धुकं तरंगू लागलं. शुद्धीवर आलो तेव्हा माझी कॉलर सैल केल्याचं आढळलं. जिभेवर ब्रँडीची चव रेंगाळत होती. होम्स हातात फ्लास्क घेऊन माझ्या खुर्चीशी वाकून उभा होता.

''वॅटसन, माझ्या दोस्ता माफ कर!'' नेहमीच्या चिरपरिचित आवाजात तो म्हणाला, ''तुला एवढा धक्का बसेल याची मला कल्पना नव्हती.''

''होम्स, तू खराच आहेस?'' त्याचा हात घट्ट धरून मी विचारलं, ''तू जिवंत आहेस? त्या पाताळातून वर येणं तुला शक्य झालं?''

''क्षणभर थांब.'' होम्स म्हणाला, ''तू काही ऐकण्याइतका सावध झाला आहेस का? मी केलेल्या नाटकामुळं तुला चांगलाच धक्का बसलाय.''

''मी आता चांगला सावध झालोय, पण अजूनही माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास नाही. तू माझ्यासमोर उभा आहेस हे पटतच नाही.'' पुन्हा एकदा मी त्याच्या कोटाची बाही पकडून खाली त्याचा हात असल्याची खात्री करून घेतली. ''नाही, तू भूत नक्कीच नाहीस. तुला पाहून मला आनंदानं वेड लागायची वेळ आलीय. आता खाली बस आणि तू त्या काळाच्या अक्राळविक्राळ दाढेतून जिवंत परत कसा आलास ते सांग.''

माझ्यासमोर बसून त्यानं आपल्या नेहमीच्या पद्धतीनं सिगारेट ओढायला सुरुवात केली. त्याच्या अंगावर अजूनही तो पुस्तकविक्रेत्याचा ढगळा कोटच होता पण तो पांढराशुभ्र केशसंभार आणि जुन्या पुस्तकांचा ढीग आता टेबलावर

पडला होता. आता तो पूर्वीपेक्षा प्रकृतीनं रोडावलेला दिसत होता. फिकुटलेल्या चेहऱ्यावरून त्याला अलीकडं बरंच काही सहन करावं लागलं असावं असं वाटत होतं.

''असं हातपाय पसरून आरामात बसल्यावर जरा बरं वाटलं बघ. उंच माणसानं तासन् तास तंगड्यातोड करत भटकणं म्हणजे चेष्टा नाही. बरं, आता सारा खुलासा करण्यापूर्वी मला तुझी मदत हवी आहे. आज रात्री आपल्याला एका जोखमीच्या मोहिमेवर जायचं आहे. हे काम आटोपलं की, मग मी तुला सारं काही सविस्तर सांगेन.''

''पण मला फारच उत्सुकता आहे. आत्ताच सांगितलंस तर बरं होईल.''

''तू रात्री माझ्याबरोबर येणार आहेस ना?''

''तू म्हणशील तेव्हा. म्हणशील तिथं.''

''आता कसं आपलं पूर्वीसारखं सुरू झालं. निघण्यापूर्वी आपल्याला व्यवस्थित जेवूनही घेता येईल. आता त्या दरीविषयी विचारत असशील तर तिथून बाहेर पडणं मला विशेष अवघड गेलं नाही. कारण मी दरीत पडलो नव्हतोच.''

''काय? तू दरीत पडलाच नाहीस?''

''नाही वॅटसन! खरंच नाही! तुला लिहिलेली चिठ्ठी मात्र खरीच होती. त्या दुष्ट मॉरीऑर्टीला त्या अरुंद रस्त्यावरच्या सुरक्षित जागी उभा असलेला पाहून क्षणभर मलाही आपला कारभार आता आटोपला असं वाटलं. त्याच्या नजरेत मृत्यूच दिसत होता. त्याच्याशी दोन शब्द बोलून मी चिठ्ठी लिहिण्याची परवानगी मिळवली. ती लिहून झाल्यावर सिगारेट केस खाली ठेवली आणि रस्त्यानं चालू लागलो. मॉरीऑर्टी मागोमाग होताच. रस्त्याच्या टोकाला पोहोचताच मी कडेला उभा राहिलो. मॉरीऑर्टीनं धावत येऊन मला विळखा घातला. आपला सारा खेळ संपल्याचं लक्षात आल्यानं तो मला संपवण्यासाठी वेडा झाला होता. कड्याच्या टोकाशी आम्ही धडपडत होतो. मला असलेलं जपानी कुस्तीचं ज्ञान मला उपयोगी पडलं. मी त्याच्या मगरमिठीतून निसटलो. भयानक किंकाळी फोडून तोल सांभाळण्याचा त्यानं प्रयत्न केला, पण तो फुकट गेला. दुसऱ्याच क्षणी त्याचा देह हात पसरलेल्या अवस्थेत फेकला गेला. मी कड्यावरून वाकून पाहिलं. खाली जाणारा त्याचा देह एका दगडावर आपटला आणि उसळी घेऊन वाहत्या पाण्यात दिसेनासा झाला.''